दूरध्वनी क्रमांक : २२०४१८०३/
२२०४२८६६

क्र. निशि/मागणी/२०१४/का.क्र.२/प्रा.कुटुंब/जा.क्र. ९५५

नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा
यांचे कार्यालय, एक्सप्रेस इमारत, २ रा मजला,
चर्चगेट, मुंबई-४०० ०२०

दिनांक - ०६/१२/२०१४

प्रति,

१. सर्व उपनियंत्रक शिधावाटप, परिमंडळ कार्यालये

२. सर्व शिधावाटप अधिकारी, शिधावाटप कार्यालये

**विषय :- राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३ अंतर्गत प्राधान्य कुटुंबातील लाभार्थ्यांसाठी अन्नधान्याचे मासिक नियतन माहे जानेवारी, २०१५.**

**संदर्भ :-** क्र.असुका-२०१४/प्र.क्र. ४३/नापु. २२ दि. १ डिसेंबर, २०१४.

शासनाच्या उपरोक्त संदर्भानुसार मुंबई-ठाणे शिधावाटप क्षेत्रासाठी माहे जानेवारी, २०१५ करीता, ८८०७६३७ प्राधान्य कुटुंबातील लाभार्थी सदस्य संख्येसाठी १७५४३ मे. टन तांदूळ व २५७६४ मे. टन गहू असे एकूण ४३३०७ मे.टन अन्नधान्याचे नियतन मंजूर करण्यात आले आहे.

सदर नियतनाच्या अनुषंगाने माहे जानेवारी, २०१५ करिता राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३ च्या प्राधान्य कुटुंबातील लाभार्थ्यांसाठी अन्नधान्याचे परिमाण प्रति व्यक्ति ५ किलो अन्नधान्य (तांदूळ २ किलो व गहू ३ किलो) असे आहे.

परिमंडळ कार्यालयांनी कळविलेल्या माहे नोव्हेंबर, २०१४ अखेरील अधिकृत शिधावाटप दुकाननिहाय शिधापत्रिका, त्यावरील लोकसंख्येच्या अहवालानुसार प्राधान्य कुटुंबातील लाभार्थ्यांसाठी माहे जानेवारी, २०१५ करीता परिमंडळनिहाय तांदूळ व गव्हाचे नियतन मंजूर करण्यात येत आहे. अधिकृत शिधावाटप दुकाननिहाय नियतनाचा तक्ता सोबत जोडला आहे.

**प्राधान्य कुटुंबातील लाभार्थ्यांसाठी माहे जानेवारी, २०१५ करिता परिमंडळनिहाय नियतन**

(आकडे मे.टन मध्ये)

| अ. क्र | परिमंडळ | एकूण | | मंजूर नियतन | |
|---|---|---|---|---|---|
| | | शिधापत्रिका | लोकसंख्या | तांदूळ (प्रति व्यक्ति २ किलो) (९८.९५%) | गहू (प्रति व्यक्ति ३ किलो) (९६.८८%) |
| १ | अ | २२३४३१ | ९७९३६२ | १९३८.२३५ | २८४६.५४५ |
| २ | ड | २४७४५५ | १३०२१०८ | २२८१.१६७ | ३२०३.३०५ |
| ३ | ई | ५३७३६९ | २१११७२० | ४९७०.९३३ | ७३००.३८२ |
| ४ | ग | २६८८२६ | ११९६५५१ | २३६८.०८७ | ३४७७.८०६ |
| ५ | फ | ६९४८२२ | ३०७४४४७ | ६०८४.५७८ | ८९३५.९६२ |
| एकूण | | १९७१९०३ | ८८६४१८८ | १७५४३.००० | २५७६४.००० |

राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३ अंतर्गत शिधापत्रिकाधारकांना विहीत वेळेत अन्नधान्य पोहोचण्याच्या व उचल पूर्ण होण्याच्या दृष्टिकोनातून माहे जानेवारी, २०१५ करीता प्राधान्य कुटुंबातील लाभार्थ्यांसाठी वितरण आदेश त्वरीत निर्गमित करण्यास सुरवात करावी. तथापि १००% वितरण आदेश दिनांक २०.१२.२०१४ पर्यंत निर्गमित करावेत. संलग्न संस्थांनी या योजनेतील अन्नधान्याची उचल कोणत्याही परिस्थितीत दि. ३१.१२.२०१४ पर्यंत १००% पूर्ण करावी.

गोदामातून उचल केलेले अन्नधान्य विहित मुदतीत सर्व संबंधित शिधापत्रिकाधारकांना पोहोचेल याची सर्व परिमंडळ उपनियंत्रक शिधावाटप यांनी खबरदारी घ्यावी व त्यासाठी आवश्यक ती उपाय योजना करुन उक्त परिपत्रकांतील आदेशाची अंमलबजावणी करावी.

अधिकृत शिधावाटप दुकानदारांनी अन्नधान्याची मागणी न नोंदविल्यास अथवा संघटित संस्थांनी मुदतीत १०० % धान्याची उचल न केल्यास त्यांचेविरुद्ध नियमानुसार कारवाई करण्यात यावी.

सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत वितरीत करण्यात येणाऱ्या शिधाजिन्नसांचा गैरव्यवहार होणार नाही याची दक्षता उप नियंत्रक शिधावाटप व शिधावाटप कार्यालयातील अधिकारी /कर्मचारी यांनी घ्यावी. त्यासाठी अधिकृत शिधावाटप दुकानांच्या मानकाप्रमाणे व रोस्टरनुसार नियमित व अचानक तपासण्या कराव्यात. तसेच या कार्यालयाचे परिपत्रक दि. २२/०७/२००९, दि. ३०/०७/२००९ तसेच आय. डी. टी. बाबत पत्र दिनांक ०५/०१/२०१० मध्ये दिलेल्या सूचनांची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी.

या नियतनापैकी उचल व वाटप केलेल्या अन्नधान्याचा साप्ताहीक तसेच पाक्षिक अहवाल न चुकता या कार्यालयास तसेच उपसंचालक, नागरी पुरवठा (गो/वा) यांना पाठवावा.

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा
मुंबई.

प्रत माहितीस्तव अग्रेषित :-

१. मा. राज्यमंत्री, अनापु व ग्रासंवि आणि सावांवि, मंत्रालय, मुंबई.
२. मा.खासदार, सर्व मुंबई/ठाणे शिधावाटप क्षेत्र, ( संबंधीत परिमंडळामार्फत )
३. मा.आमदार, सर्व मुंबई /ठाणे शिधावाटप क्षेत्र, ( संबंधीत परिमंडळामार्फत )
४. मा.महापौर, मुंबई, नवी मुंबई,ठाणे,कल्याण-डोंबिवली, उल्हासनगर, भिवंडी, मिरा-भाईंदर महानगरपालिका(संबंधीत परिमंडळामार्फत)
५. मा.आयुक्त, महानगरपालिका, मुंबई, नवी मुंबई, ठाणे, कल्याण-डोंबिवली, उल्हासनगर, भिवंडी. मिरा-भाईंदर महानगरपालिका (संबंधीतपरिमंडळामार्फत)
६. मा.नगराध्यक्ष, अंबरनाथ, बदलापूर. ( संबंधीत परिमंडळामार्फत )
७. उपसचिव, अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
८. वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, ४२ सर वि.ठा.मार्ग, मुंबई

९. कार्यासन अधिकारी, कार्यासन क्र.२२ व २८ अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मंत्रालय,मुंबई
१०. पर्यवेक्षक अधिकारी, श्रम मंत्रालय,७१ बी श्रम साफल्य, एन.जी.आचार्य मार्ग, चेंबूर, मुंबई ७१.
११. रेशनिंग कृती समिती, ,.आर.एच.४,सी - ४,लेन- ८, सेक्टर ९ सी.बी.डी.बेलापूर, नवी मुंबई १४.
१२. श्री. रेडकर संघटक, घरकाम मोलकरीण संघटना, भुपेश गुप्ता भवन, ८५-सयानी रोड, प्रभादेवी, मुंबई.
१३. घरकाम मोलकरीण संघटना, मुंबई जिल्हा अंधेरी, घन:श्याम पाटील चाळ,एस.व्ही.रोड,अंधेरी (प), मुं-५८
१४. विशेष कार्यकारी अधिकारी, कामगार आयुक्तांचे कार्यालय, कामगार भवन, सी-२०, ई ब्लॉक, बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पू.), मुंबई-५१.
१५. संदीप सुमन,रेशनिंग व जिविका हक्क संघटना, नवीन बीडीडी चाळ नं. १५/५६, महात्मा ज्योतिबा फुले मार्ग, नायगांव, मु. १४

प्रत आवश्यक त्या कार्यवाहीस्तव अग्रेषित :-

१. व्यवस्थापकीय संचालक,महाराष्ट्र राज्य सह.पणन महासंघ मर्या.,कनमूर हाऊस, नरसी नाथा स्ट्रीट, मुंबई.
२. मा. महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचलनालय, मुंबई.
३. उप संचालक, नागरी पुरवठा (गो/वा) परेल, मुंबई.
४.उप संचालक नागरी पुरवठा, पुरवठा आयुक्तांचे कार्यालय, शासकीय कुटीर क्र.५, फ्रि प्रेस जर्नल मार्ग, मुं-२१
५. सहाय्यक नियंत्रक शिधावाटप, (दक्षता शाखा).
६. सर्व संघटित संस्था, परिमंडळ कार्यालयामार्फत.
७. कार्यासन अधिकारी, दक्षता शाखा, प्रशासन शाखा व नियंत्रण कक्ष, प्रधान कार्यालय.